योगिता वि. ताराबाई
दि.कि.अर्ज क्र. ०२/२०२६

MHNS140000952026

<u>सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर , दिंडोरी यांचे न्यायालयात</u>

(पिठासिन अधिकारी – अश्वीनी अ. पंडित)

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०२/२०२६</u> नि.क्र.१६

१. **श्रीमती योगिता संजय शिंदे**
वय .३९ वर्ष, धंदा– घरकाम

२. **कु.कृष्णा संजय शिंदे**
वय.–१३, धंदा – शिक्षण
अर्जदार क्र २ ची अ.पा.क म्हणून
अर्जदार क्र १ असे
रा.–मोहाडी, ता दिंडोरी जि नाशिक **अर्जदार.**

<u>**विरूध्द**</u>

१. **श्रीमती ताराबाई मधुकर शिंदे**
उ. वय – ६०, धंदा – घरकाम,
**रा. मोहाडी**, ता. दिंडोरी जि. नाशिक

.......................................................................................................

अर्जदारातर्फे – विद्वान विधीज्ञ श्री.आर. बी. गटकळ

.......................................................................................................

**योगिता वि. ताराबाई**

**दि.कि.अर्ज क्र. ०२/२०२६**

**<u>अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा दाखला मिळण्याकरिता</u>**

**<u>न्यायनिर्णय</u>**

(दिनांक : ०१/०४/२०२६)

सदरचा अर्ज यातील अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा दाखला मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र १ चे पती व अर्जदार क्र २ चे वडिल तसेच सामनेवाला यांचा मुलगा संजय मधुकर शिंदे हे मराठा विदया प्रसारक समाज नाशिक या शैक्षणिक संस्थे अंतर्गत राजश्री शाहु महाराज पॉलिटेकनिक नाशिक येथे शिपाई या पदावर नोकरीस होते. संजय मधुकर शिंदे हे मराठा विदया प्रसारक समाज नाशिक या शैक्षणिक संस्थे अंतर्गत राजश्री शाहु महाराज पॉलिटेकनिक येथे नोकरीस असतांना दि. ०२/०९/२०२५ रोजी मयत झाले आहेत. कै. संजय मधुकर शिंदे हे मयत झाल्यावर त्यांचा अंतिम संस्कार व त्यानंतरचे धार्मिक विधी हे देखील मौजे मोहाडी , ता. दिंडोरी येथे अर्जदार व सामनेवाले यांनीच केलेले होते व आहेत.

**०३.** अर्जदार ही मयत कै. संजय मधुकर शिंदे यांची पत्नी असून तिस तिचे पतिचे मृत्यू पश्चात नोकरीची गरज व आवश्यकता आहे. अर्जदार हिचे शिक्षण झालेले असुन ती साक्षर आहे. अर्जदार ही यापूर्वी कोठेही नोकरीस नसुन सध्या कोठेही कामधंदा करत नाही. त्यामुळे अर्जदार हिस तिचे मयत पति कै. संजय मधुकर शिंदे यांचे खात्यात नोकरी करण्याची इच्छा असल्याने अर्जदार हिस मराठा विदया प्रसारक समाज नाशिक या शैक्षणिक संस्थेमार्फत राजश्री शाहु महाराज पॉलिटेकनिक नाशिक या संस्थेत अनुकंपा तत्वावर नोकरीस लागणेकामी तसेच इतर शासकिय व निमशासकिय कामासाठी वारस दाखला मिळावा या करीता सदरचा अर्ज अर्जदारने या मे कोर्टात दाखल केला आहे.

**०४.** सदर अर्जदार व सामनेवाल्यांशिवाय इतर कोणी वारसदार आहे काय या बाबत नि.क्र.११ प्रमाणे जाहीर नोटीस देवुन व तसेच नि.क्र. ०७ प्रमाणे जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला. त्या अनुषंगाने सामनेवाले प्रस्तुत अर्जात नि.क्र १० वर हजर होवून अर्जात जबाब दाखल करुन अर्जदारास वारस दाखला देण्यास हरकत नसल्याचे कथन केले.

**०५.** अर्जदार क्र १ ने नि.क्र. १२ वर तिचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदाराने तिच्या पुराव्यात कै. संजय मधुकर शिंदे यांचे सेवा पुस्तकाचे प्रत नि.क्र ३/१, मृत्यु प्रमाणपत्र नि क्र.३/२, अर्जदाराच्या आधारकार्डच्या प्रत ३/३ ते ३/४ कडे दाखल केल्या, पेपर नोटीस नि.क्र ११ व जाहिरनामा नि. क्र ७. अर्जदाराने नि.क्र १३ कडे त्यांची पुरावा बंद पुरसिस दाखल केली.

**०६.** अर्जदाराने युक्तीवाद करुन त्यात अर्जाप्रमणे सर्व मजकूर जसाच तसा नमुद केला आहे. पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर मजकूर नमुद करण्यात येत नाही. सदर पुराव्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार क्र १ ही कै. संजय मधुकर शिंदे यांची कायदेशीर वारस असून तिला अर्जात नमुद केलेल्या कारणांसाठी वारस दाखला देणे योग्य व न्यायोचित ठरेल. या ठिकणी ही बाब नमुद करणे आवश्यक आहे की, सामनेवाले यांनी देखिल अर्जदारास वारस दाखला देण्यास समंती दर्शवली आहे.

**०७.** सबब, उपरोक्त पुराव्या आधारे प्रथमदर्शनी अर्जदाराच्या अर्जास नाकारण्याचे कोणतेही कारण दिसुन येत नाही. त्यामुळे अर्जदार क्र १ ही कै.संजय मधुकर शिंदे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दाखला देणे योग्य व न्यायोचित राहिल. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**योगिता वि. ताराबाई**

**दि.कि.अर्ज क्र. ०२/२०२६**

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार १ ही कै. संजय मधुकर शिंदे यांचे कायदेशीर वारसदार असल्याने तीस वारस दाखला देण्यात येतो.

३. अर्जदाराने योग्य तो न्यायालयीन मुद्रांक अदा करावा.

PANDIT ASHWINI ANIL

Digitally signed by PANDIT ASHWINI ANIL
Date: 2026.04.04 17:37:21 +0530

दिनांक ०१/०४/२०२६

(अश्वीनी अ. पंडित)
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), दिंडोरी
(MH03260)